जयहिंदमाता.

# शाहिरी-डफ

## पोवाडा २३ वा

### उन्नती काऽ आवनती या पोवाड्यातील कांहीं भाग.

ले. कविभूषण, महाराष्ट्र शाहीर, प्रल्हादराय जामखेडकर, जळगांव

झाली उन्नती काऽ आवनती। कळेनाकिती। या भारती। ग्यानी लोकांचा झाला मूकाळ। बोक्यावानी भांडती त्याला नाही। ताळ। लागले भिकेला होती हाक हाल ॥ धृ. ॥

### भाग ३ रा.

सुधारणेचा लागेना अंत। खेड्या पाड्यात। सर्व लोकांत। मुळेती रूजली तिची आरपार। सुनेना दिसे अेक घरदार। भरला हो मायावी बाजार॥ फॅशनचा. वाढता काळ। झाले बेताल। सोडिले मूळ। बुडाला नीती धर्म सुविचार। नखऱ्या मध्ये दंग सदा राहणार। तुछता भरली सर्व आगांत॥ स्त्रिया मध्यें शिरली फॅशन। केस विंचरून। आकडे लावून। डोईला चक्कर शोभे भरदार। मध्ये भरतिला केश संभार। किंवा हाले डुले शेपटा प्यार॥ पारदर्शक नेसण्या छीट। होऊनी धीट। बोले झटपट। लुगड्याचे ओझें बाई ते फार। आंग नाही मुळीच यातून दिसणार। टकमक लोक कसे पहाणार॥ कामेट्याची झाली अडचण। गोल नेसून।

दिसे मी छान । काटकसर होते त्यामधे फार । चडी दंडिया फुकट मिळणार । विट आला गडे जुन्याचा फार ॥ पदराने सोडिली जागा । नाही त्या आगा । कुठेही सोगा । पदर सोडुन द्यावा झटकन । दिसेना छाती झाली आडचणा। हाताने घेती मागे भरकन ॥ झंपर आले मागो माग । बुडाले माग । सुधारले जग । साळी कोष्टिही झाले बेकार । कंगाल देश झाल पहा अनिवार । अशी कोष्टके शाळेत नसणार ॥ चाल— कुंकवाची टिकली भालाला । बांगडीचा आला कंटाळा ॥ राखोडा फाशी तोंडाला । लाल भडक रंग ओठाला ॥ पादत्राणे हावीत पायाला । ना दिसे सुनी अेक बाला ॥ चाल— गहीरी नजर चोही बाजुला । मागे पुढे पहाण्याचा चाळा । काण्टा धरून अेका हाताला । ठुनकत ठुमकत चाले रस्त्याला । जणु वाटे लांडोर नाचत आल मार्गाला ॥ वेश्यांना आला कंटाळा । सोडुन दिल त्यांनी नखऱ्याला । भर पदर घेती डोईला । वाटे लाज वेश्यांना पाहुन या नव बाला ॥ चाल:— स्त्री शिक्षणेच जग उन्नती पहा पावते ॥ असे वदती जगीते शास्त्री पढीक जाणते ॥ भात भाजी करण्यासी ज्ञान मुळी ते नसे ॥ स्वयंपाक करण्यासि नित्य बुक लागते ॥ त्यांतही चूका होउनी भाकरी करपते ॥ मिडवाईफ वाचून बाळांतीण आडते ॥ मुलांचे संगोपन करण्या दाई लागते ॥ मॅटरनिटी होम मध्ये जाऊनी बाई प्रसवते ॥ चाल:— राम कृष्ण स्त्रियांचे पोटी जन्मले जेव्हां ! । शिक्षण होते का तेव्हां ! ॥ पृथ्वीराज प्रतापसिंह ते जन्मले जेव्हा ।

शिक्षण होते का तेव्हा ।। जिजाईच्या पोटी शिवबाळ जन्मले जेव्हा । शिक्षण होते का तेव्हा । झांशीवाली लक्ष्मीबाई जन्मली जेव्हां । शिक्षण होते का तेव्हा ।। राय बागीण जन्मली जेव्हा । शिक्षण होते का तेव्हां ।। राजसूत्रे हलविते अहिल्या देवी जेव्हां । शिक्षण होते का ! तेव्हां ।। महात्मा, नेहरू, सुभाषबाबूते जन्मले जेव्हा । शिक्षण होते का तेव्हा ।। लोकमान्य आणि सावरकर जन्मले जेव्हा । शिक्षण होते का तेव्हा ।। ज्ञानेश्वर रामदास तुका जन्मले जेव्हा । शिक्षण होते का तेव्हा ।। (मिळवणी) धन्य धन्य वीर त्या माता । धन्य पतीव्रता । रक्षि भारता । प्रसवल्या संतयोगी महंतास । तसेची शूरवीर पुत्रास । हलीचे थेर ठावना त्यांस ।। चाल:- प्रेमाची साथ ही आली । कित्येक जळून मेली ।। परदेशी शिक्षणा जागी । तिकडेच वर शोधती ।। कित्येक घात की चाली । आल्या हो आमुच्या भाली (मिळवणी) पूर्वीच्या स्त्रिया निष्णात । घर कामात । आणि धंद्यात । शक्ती संपन्न होत्या त्या खास । टवटवीत चेहरा उग्र दिसण्यात । क्षयरोगी ही नव्हत्या दिसण्यात ।। चाल:- मोलकर्णी वाचुन आडत नव्हते घर काम ।। या मुळे स्त्रियांना नव्हती शक्तीची वाण ।। काम धंदा गेला खड्यात पुस्तकी ज्ञान ।। नळ आला भरतीला स्थाची होती ती वाण ।। पिठाच्या गिरणीनें केली सारी धुळधाण ।। चाल.- ना आवडे सासु सासरा । दिर जावा ननंद सोयरा । तुं राजा आणि मी राणी करू पो बारा ।। कामास हात लाविना । गुरकावते उलट

नवऱ्याला । सांभाळा जरा पोराला । मंडळात थोडे फार जाते बघा खेळण्याला ॥ चुलीचा आला कंटाळा । हॉटेलात जाते जेवण्याला । परभारे जाती सिनेमाला । संसाराच झाल वाटोळ आनंद लोपला ॥ नेमाने जाते फिरण्याला । वेळ आवेळ नाही गन्तीला, कुठे जाते शोधा मनाला । शक्तीचा ऱ्हास ठरलेला । फॅशनकेला धुमाकूळ ठेवा ध्यानाला ॥ बेकारी आमच्या बाप्याला । त्यांत ही स्त्रिया भरतीला । सर्वांना पाहिजे सर्विस ती करण्याला ॥ चाल:– वीर माता भगीनी पत्नी पाहिजे आम्हाला ॥ नखरेल तरूणी नकोत आज देशाला ॥ हरघडी फुलवाल्यात त्यांनी देश भावना ॥ देश भक्त होण्याचा पाठ द्यावा मुलांना ॥ खरा मार्ग शोधण्या अव्हान ज्ञानी लोकांना ॥ नाहीतर सोडुन द्यान्या व्यर्थ वल्गना ॥ ( मिळवणी ) देशाची झाली उन्नती । का आवनती । खरोखर किती । छाती ठोक सांगा स्मरून देवास । प्रश्न हा सारा ज्ञानी लोकास । प्रल्हाद राय म्हणे सोडवा त्यास ॥

---

पोवाडे विकत मिळण्याचें ठिकाण:—

## जामखेडकर आणि सन्स जळगांव पू. खा.

समता प्रेस, जळगांव.